# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

<u>**प्रसिद्धी पत्रक                                        ता. ८ फेब्रुवारी २०१९**</u>

# बिहारचे उपमुख्यमंत्री सुशील मोदी यांचे मनपातर्फे स्वागत

**नागपूर, ता. ८ :** नागपूर दौऱ्यावर आलेले बिहारचे उपमुख्यमंत्री सुशील मोदी यांचे शुक्रवारी (ता. ८) नागपूर महानगरपालिकेतर्फे स्वागत करण्यात आले. उपमुख्यमंत्री सुशील यांनी दीक्षाभूमीला भेट देऊन भगवान बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तींना अभिवादन केले. तसेच परिसराची पाहणी केली. यावेळी नागपूर महानगरपालिकेचे विधी विशेष समिती सभापती धर्मपाल मेश्राम यांनी उपमुख्यमंत्री सुशील मोदी यांचे पुष्पगुच्छ देउन स्वागत केले.

याप्रसंगी सुभाष पारधी, अशोक मेंढे, सतीश सिरसवान, राहुल मेंढे, विशाल लारोकर, सुनील सिरसाट, संदीप बेले, विजय फुलसुंगे यांच्यासह दीक्षाभूमी स्मारक समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.